(१)

## – संत कबीर –

महाराष्ट्राची संत परंपरा मोठी आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, रामदास असे अनेक थोर संत होऊन गेले. त्यांनी आपल्या कृतीतून कार्यातून भजन अभंगातून त्यावेळच्या समाजाला नवी दिशा दिली. कांही अनिष्ट रुढी परंपरांना निर्भीडपणे विरोध केला आणि समाजाला जागृत केले.

महाराष्ट्रात हे संत होऊन गेले तसे भारतात इतर प्रदेशांत सुध्दा अनेक संत महात्मे होऊन गेले जसे उत्तर भारतात संत तुलसीदास. त्यांनी "तुलसी रामायण सारखा ग्रंथ लिहीला. अनेक भजने, अभंग दोहे लिहीले. असेच उत्तर भारतातले दुसरे संत "कबीर दास."

कबीरांच्या जन्म वर्षाबद्दल बरेच विवाद आहेत. जन्म-१४४० प्रताप घर येथे व मृत्यु-१५१८. मघर येथे. त्यांच्या बद्दल पण धर्म काय होता या विषयी माहिती मिळत नाही. ते मानवजातिचे व मानवतेचे पुजारी होते. त्यांनी कोणच्याही प्रकारे कुठलाही धर्मभेद, जातिभेद, पंथभेद मानला नाही व त्याला दुजोराही दिला नाही. सर्व समाज एकमताने एकजुटीनेही राहावा म्हणून त्या काळी बऱ्याच महापुरुषांनी अथक प्रयत्न केले. त्यातलेच एक संत कबीर. तेही समाजासाठी आमरण झटले.

खर म्हणजे कबीरांचे जन्मदाते कोण याबद्दलही कांहीं माहीत नाही. पण त्यांच्या जन्माविषयी एक परंपरागत कथा सांगितली जाते.

ज्येष्ठ पौर्णिमेला एका ब्राम्हण विधवेच्या पोटी एक पुत्र जन्माला आला. समाजात राहून उघडपणे मुलाचे पालन पोषण करणे त्या स्त्रीला शक्य नव्हेल म्हणून तिने काशीला एका सरोवराच्या काठी मुलाला सोडले.

(2)

कर्मधर्म संयोगाने एका मुस्लिम जोडप्याने ते बाळ पाहिले आणि घरी घेऊन गेले. त्यांनी त्या बाळाचे उत्तम रितीने पालन पोषण केले. पुढे मोठा झाल्यावर हाच मुलगा कबीर नावाने प्रसिद्धी पावला.

कबीर जरी मुसलमान कुटुंबात वाढले तरी ते रामाचे उपासक होते. त्यांच्या बद्दल इतर काही माहिती नाही पण अशी कथा आहे की त्यांचा विवाह झाला होता. पत्नीचे नाव लोई होते. मुलाचे कमाल व मुलीचे कमाली नांव होते. ते ज्या कुटुंबात वाढले ते विणकर होते. त्यामुळे अर्थातच कबीर विणकरच होते.

कबीर सर्व धर्मांना मानीत होते. त्यांनी राम, कृष्ण, विठ्ठल या हिंदू देवतांवरील अनेक पदे लिहीली आहेत. ते सर्व धर्मांच्या पलिकडे असलेल्या परब्रम्हस्वरुप परमेश्वरालाच मानत असत. ते म्हणत सर्व साधुसंत, लोक आणि जे देव आपण मानतो ते त्या परब्रम्हस्वरुप विठ्ठलाची लेकरे आहेत.

कबीरांनी अनेक दोहे, पद लिहीत तत्कालीन समाजाच्या रुढींवर निर्भिडपणे प्रहार केले. त्यातून सत्य, ज्ञान या विषयी समाजाला शिकवण दिली.

आशा पावगी.
"आनंदवन" B - 10
वृंदावन कॉम्प्लेक्स.
कोथरुड.

(3)

## – कबीरांचे दोहे –

मला पूर्णपणे आठवत नाही पण तरी थोडा मासला देते.

१) बिना भगवत कोई नही अपना।
काहे धोये मलमल काया। संग नही ले जाना।
सुंदर रूप और मस्त जवानी
माटी मे मिल जाना ।।

अस कांहीतरी आठवलं कदाचित चुकलं असेल.

—— x ——

२) गुरुकृपा अंजन पायो मेरे भाई।
राम बिना कछु जानत नाही ।।
अंतर राम बाहिर राम।
जहाँ देखो वहाँ राजा राम ।।
जागत राम सोवत राम।
जो देखत वो राम सरिखा ।।
कहत कबीर। अनुभव नीखा।
जहाँ देखो वहाँ राम ही राम ।।

लहानपणी वडीलांच्या तोंडून बरीच भजन दोहे ऐकले आहेत। फार कांही आठवत नाही।

कांहीं चुकलं असल्यास क्षमस्व.

आशा पावगी.